# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी मार्गदर्शन केंद्र

**सातारा, दि. ५ (प्रतिनिधी) :** सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाऊंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्लाकेंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील तसेच केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे मिळविता येईल. बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी केली.




खुर्च्यांचे वितरणप्रसंगी खा.उदयनराजे भोसले, श्री.छ.दमयंतीराजे भोसले, जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल, सौ.रितु छाब्रीया, डॉ.पी.के.ग्रॅंट व इतर.

सातारा येथे सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेअरच्या वितरणप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी खा.श्री.छ.उदयनराजे भोसले, श्री.छ.दमयंतीराजे भोसले, जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी सौ. पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा.लि. चे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे सीईओ झाल कूपर, रुबी हॉल क्लिनीकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम हॉस्पीटलच्या भारती पाटील यावेळी उपस्थित होते.

मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, या मुलांना तसेच त्यांच्या मातांना पुण्यातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व समुपदेशन केले जाणार आहे. यामुळे परिणामकारक उपचार होण्यास मदत होणार आहे. गरजू मुलांपर्यंत या सुविधा पोहचाव्यात, यासाठी दुर्गम भागातील मुलांना या केंद्रापर्यंत येण्यासाठी वाहतुकीच्या सोई पुरविण्याचे आवाहन त्यांनी जिल्हा प्रशासनाला केले.

दमयंतीराजे भोसले म्हणाल्या, रितू छाब्रिया आणि त्यांचे काम हे मी पुण्यात असल्यापासून ओळखते. कोणत्याही अंतस्थ हेतूशिवाय आणि केवळ परोपकाराच्या भावनेने त्या हे उदात्त कार्य करत आहेत. मुकुल माधव फाऊंडेशन करत असलेले काम कौतुकास्पद असून प्रत्येकाने त्याला दाद द्यायला हवी.

डॉ.परवेझ ग्रँट म्हणाले, या कार्याचा मला अत्यंत आनंद होतो. आम्ही साताऱ्यातील रुबी हॉल क्लिनीकमध्ये मुकुल माधव फाऊंडेशनसाठी एक खास खोली ठेवली आहे. आमचे तज्ज्ञ व्हिडियो कॉन्फरन्सिंगद्वारे रुग्णांना मार्गदर्शन करतील.

या कार्यक्रमात एकूण पाच व्हिलचेयर्स, पाच कमोड व्हिलचेयर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली. मुकुल माधव फाऊंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत ७४ व्हिलचेयर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत. आणखी ३६ खुर्च्या येत्या सोमवारी जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमात काही सांस्कृतिक कार्यक्रम झाले. त्यात सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांनी भाग घेतला. या दृश्याने सर्व उपस्थित भावूक झाले.